लॅक्सेसने २०२१ साठीच्या नफ्याचा अंदाज वाढविला

वाहन उद्योगाकडून वाढती मागणी हा प्रमुख घटक ठरला

मुंबई,दि.१४ : लॅक्सेसने उत्तम पहिल्या तिमाहीच्या जोरावर २०२१ या संपूर्ण वर्षासाठी पायाभरणी केली आहे. स्पेशालिटी रसायन कंपनी लॅक्सेसला आता ९७० दशलक्ष युरो ते १ अब्ज युरो एवढे ईबीआयटीडीए प्री एक्सेप्शनल्स अपेक्षित आहेत. यापूर्वी कंपनीने ९०० दशलक्ष ते १ अब्ज युरोंदरम्यान उत्पन्न गृहीत धरले होते. पहिल्या तिमाहीतील ईबीआयटीडीए प्री एक्सेप्शनल्स २४२ दशलक्ष युरो आहे. याचाच अर्थ मागील वर्षाच्या पहिल्या तिमाहीच्या स्तराच्या (२४७ दशलक्ष युरो) जवळ आहे. मागील वर्षाच्या पहिल्या तिमाहीवर कोरोनाविषाणू साथीचा परिणाम तेवढा झाला नव्हता ही बाब विचारात घेता या वर्षीचे आकडे चांगले आहेत. २०२१ च्या पहिल्या तिमाहीतील समूह-व्यापी व्यासी (व्हॉल्युम्स) तर मागील वर्षाच्या तुलनेत अधिक आहे. वाहन उद्योगाकडून, विशेषत: इंजिनीअरिंग मटेरिअल विभागाकडून, वाढती मागणी हा प्रमुख चालक घटक ठरला. अमेरिकेत ॲडव्हान्स्ड इंटरमिजिएट्स, स्पेशालिटी ॲडिटिव्हज आणि कंझ्युमर प्रोटेक्शन विभागांमध्ये हवामानाशी निगडित कारणांमुळे काम बंद पडल्याचा परिणाम या वाढत्या मागणीमुळे तेवढा जाणवला नाही. मात्र, अमेरिकी डॉलरद्वारे परकीय चलन विनिमय दरावर झालेला नकारात्मक परिणाम तसेच विशेषत: जर्मनीमधील अधिक ऊर्जादरांचा नकारात्मक परिणाम या तिमाहीत जाणवला.

पहिल्या तिमाहीत समूह विक्री १.६९३ अब्ज युरोइतकी झाली. मागील वर्षाच्या पहिल्या तिमाहीतील विक्रीच्या (१.७०४ अब्ज युरो) स्तराजवळ राहण्यात कंपनीने यश मिळवले. सातत्यपूर्ण ऑपरेशन्सद्वारे समूहाला मिळणारे उत्पन्नही ६३ दशलक्ष युरोंवर स्थिर होते. चौथ्या तिमाहीतील सकारात्मक वेग कायम राहिला आहे आणि आम्ही या वर्षाची सुरुवात चांगली केली आहे.मागणीतील वाढीचा फायदा आम्हाला मिळत आहे. विशेषत: वाहन उद्योगाकडून मागणी वाढत आहे. कार्यात्मकदृष्ट्या आम्ही कोरोनाचे संकट मागे टाकले आहे आणि उर्वरित वर्षात उत्तम कामगिरी करू असा आत्मविश्वास आम्हाला वाटत आहे, असे लॅक्सेस एजीच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष मॅथियास झाशेर्ट म्हणाले.आता आम्ही आमच्या वाढीच्या प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करत आहोत आणि आमचे नवीन व्यवसाय जलदगतीने त्यांची पूर्ण क्षमता विकसित करतील हे निश्चित करत आहोत.

पहिल्या तिमाहीचे वैशिष्ट्य धोरणात्मक वाढ

पहिल्या तिमाहीत लॅक्सेसने धोरणात्मक वाढीचा पाठपुरावा केला. कंझ्युमर प्रोटेक्शन विभागात या स्पेशालिटी केमिकल कंपनीने दोन अधिग्रहणांची प्रक्रिया पूर्ण केली. फ्रेंच बायोसाइड स्पेशालिस्ट इंटास अधिग्रहित करून कंपनीने कागद व पॅकेजिंगसाठीच्या बुरशीनाशकांची श्रेणी विस्तारली आहे. निर्जंतुकीकरण व हायजिन उत्पादने पुरवणाऱ्या थेसिओचे अधिग्रहण करून लॅक्सेसने प्राणी स्वच्छता (ॲनिमल हायजिन) बाजारपेठेतील उत्पादनांमध्ये लक्षणीय विस्तार साध्य केला आहे. फेब्रुवारी २०२१ च्या मध्यात या स्पेशालिटी केमिकल कंपनीने कॉर्पोरेट इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वांत मोठ्या अधिग्रहणाची घोषणा केली. अमेरिकास्थित एमराल्ड कॅलामा केमिकल समूहाच्या अधिग्रहणामुळे लॅक्सेसला अन्नउद्योग तसेच प्राणी आरोग्य आढी अधिक नफा कमावून देणारी उपयोजनाची नवीन क्षेत्रे खुली करणे शक्य होणार आहे. नियामक मंजुऱ्या प्राप्त होऊन हा व्यवहार चालू वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत पूर्ण होईल, असे समूहाला अपेक्षित आहे.

कोरोनाबाधित कुटुंबातील पशुधन सांभाळण्यासाठी हंगामी पशू वसतिगृह

सोलापूर, दि.१४ : एखाद्या कुटुंबात कोरोना रुग्ण आढळल्यास किंवा घरातील सदस्य विलगीकरणात गेल्यास त्या कुटुंबातील पाळीव प्राण्यांच्या देखभालीचा प्रश्न कोरोना काळात प्रकर्षाने समोर आला आहे. बाधितांच्या घरातील दुभत्या व भाकड जनावरांसह, श्वानांची गैरसोय टाळण्यासाठी गोरक्षक, प्राणिमित्रांनी हंगामी वसतिगृहाची अभिनव संकल्पना राबवली आहे. शहरालगतच्या तुळजापूर रस्त्यावरील तेजामृत चॅरिटेबल ट्रस्टतर्फे गोशाळा सुरू करण्यात आली आहे. त्यामध्ये बाधितांच्या कुटुंबातील दुभत्या व भाकड जनावरांना हंगामी आधार देण्यात येत आहे. संबंधित जनावरांच्या मालकांनी स्वत: त्या गोशाळेत जनावरे दाखल करावीत. संबंधित मालक अथवा त्यांचे नातेवाईक अलगीकरणातून बाहेर आल्यानंतर जनावरांची स्वत: काळजी घेऊ शकतील, असा आत्मविश्वास त्यांना आल्यानंतर जनावरांना परत आणू शकतील. त्या दरम्यान त्या जनावरांचा सांभाळ करण्याची तयारी तेजामृत गोशाळाने घेतली आहे. माणसांना आधार देण्यासाठी अनेक संस्था, संघटना प्रयत्नशील आहेत. पण, मुक्या जीवांचे काय ? हा प्रश्न निर्माण झाला आहे. दुग्ध व्यवसाय, हा ग्रामीण भागातील प्रमुख जोडव्यवसाय आहे. सांगोला, पंढरपूर, माढा तालुक्यात महिला या व्यवसायात विशेष सक्रिय आहेत. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे जिल्ह्यातील हजारो कुटुंबे बाधित झाली आहेत. कोरोना रुग्णवाढीमुळे अनेक घरातील पाळीव प्राण्यांकडे दुर्लक्ष व्हायला लागले. औषधोपचारांसाठी रुग्णालयात दाखल झालेल्या घरातील सदस्यांमुळे त्यांकडील प्राण्यांचा आहार आणि विहार यावर बंधन आलीत. नियमित चारा-पाणी, दुभत्या जनावरांचे दुधाचे डेअरीला रतीब घालणे, वासरांची काळजी यावर बंधने आली आहेत. पाळीव प्राण्यांच्या काळजीपोटी काहीजण रुग्णालयात दाखल होत नसल्याचे चित्र आहे.

कोविडने निधन झालेल्या ठेव प्रतिनिधींना शिवकृपाची आर्थिक मदत

सातारा/प्रतिनिधी

कोविड आजाराने निधन झालेल्या ठेव प्रतिनिधींना शिवकृपा पतसंस्थेच्यावतीने आर्थिक मदत देण्यात आली.

मुंबईमधील विक्रोळी येथे सन १९८२ साली स्थापन झालेल्या शिवकृपा सहकारी पतपेढी लि., मुंबई या संस्थेचा फार मोठा विस्तार झालेला असून, ठाणे येथील प्रशासकीय कार्यालयासह सात विभागीय कार्यालये व १०० शाखा कार्यालये आहेत. ही कार्यालये मुंबई, ठाणे, नाशिक, रायगड, रत्नागिरी, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर या जिल्ह्यामध्ये कार्यरत आहेत.

संस्थेने कोविड-१९ या आजाराने मृत्युमुखी पडलेल्या संस्थेच्या दैनंदीन ठेव संकलन प्रतिनिधींना प्रत्येकी रक्कम रु. १० लाखाची आर्थिक मदत देवून सामाजिक बांधीलकी जोपासली आहे. संस्थेच्या कळवा शाखेचे दैनंदिन ठेव संकलन प्रतिनिधी संजय बोबडे व अंधेरी शाखेचे ठेव संकलन प्रतिनिधी विलास शहापूरकर यांचे कोरोना या आजाराने निधन झाले आहे. संस्थेच्या विकासातील दैनंदिन ठेव संकलन प्रतिनिधीचे महत्वपूर्ण योगदान विचारात घेता कोविड-१९ या जागतीक महामारीमुळे ठेव प्रतिनिधीचा मृत्यु झाल्यास त्यांचे वारसास संस्थेतर्फे रक्कम रु. १० लाख आर्थिक मदत देण्याचे धोरण संचालक मंडळाने निश्चित केले होते. त्याअनुषंगाने आर्थिक मदतीचा चेक व्हिडीओ कॉन्फरन्सींग द्वारे आयोजित केलेल्या संस्थेच्या संचालक मंडळाच्या साप्ताहिक सभेत शुक्रवार दिनांक ०७ मे २०२१ रोजी त्यांचे परिवारास देण्यात आला.

या प्रसंगी संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष कृष्णा तु. शेलार आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, संस्थेच्या विकासामध्ये ठेव संकलन प्रतिनिधींचे योगदान महत्वाचे आहे. त्यांचे सहकार्यानेच संस्थेची रु. ४००० कोटी सॅमिश्र व्यवसायाकडे वाटचाल सुरु आहे. कोविड-१९ या जागतीक महामारीमुळे मृत्युमुखी पडलेल्या संस्थेच्या दैनंदीन ठेव संकलन प्रतिनिधींना प्रत्येकी रक्कम रु. १० लाखाची आर्थिक मदत देण्याचे धोरण संस्थेने अवलंबले आहे.

या सभेस संस्थेचे उपाध्यक्ष वसंत चव्हाण, संस्थापक संचालक चंद्रकांत वंजारी व संचालक मंडळाचे इतर सदस्य, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शेतकरी आंदोलनामुळे गावे बनली हॉटस्पॉट

चंदीगड , दि.१४ (हिंदुस्थान समाचार) : देशभरात कोरोना साथरोगाचा प्रकोप सुरू असताना दिल्लीच्या टिकरी आणि सिंघू सीमांवर शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनांमुळे दिल्ली सीमेवरील हरियाणाची काही गावे कोरोना हॉटस्पॉट बनल्याचा दावा हरियाणाचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांनी केलाय.

यासंदर्भात खट्टर म्हणाले की, महिन्याभरापूर्वी शेतकरी नेत्यांना कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले होते. परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर पुन्हा आंदोलन करता येईल, असा सल्ला देखील दिला होता. मात्र



मनोहरलाल खट्टर यांचा दावा

आता या आंदोलनामुळे काही गावे की करोनाचा हॉस्पॉट झाली आहेत. येथील काही गावकरी या आंदोलनाच्या ठिकाणी सतत ये जा करत असल्याने हा प्रकार घडल्याचे खट्टर यांनी सांगितले.

दरम्यान हरियाणात मागील तीन दिवसांपासून करोनाबाधितांची संख्या कमी होत आहे. आज एक लाख सात हजार सक्रिय रुग्ण राज्यात आहेत. राज्यातील आरोग्य व्यवस्था सध्या जेवढी गरज आहे त्यासाठी पुरेशी असल्याचे खट्टर यांनी सांगितले.

अक्षय्य तृतीयेनिमित्त पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात अवतरली आमराई

सोलापूर, दि.१४ : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने शुक्रवारी अक्षय तृतीया निमीत्त श्री विठ्ठलरूक्मिणी मातेच्या गाभाऱ्यात व मंदिरात आकर्षक व नयनरम्य अशी आमराईची आरास करण्यात आली आहे. यामुळे मंदिराचा गाभारा मनमोहक दिसत आहे.

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय्य तृतीया निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात हापूस आंबा व पानांचा वापर करुन सजावट करण्यात आल्याने श्री च्या गाभाऱ्यात आमराई अवतरल्याचे दिसत आहे. ही मनमोहक आरास श्री विठ्ठल भक्त विनायकशेठ काची-बुंदेले, पुणे यांनी मोफत सेवा केली आहे. याकरिता हापूस आंबा, आंब्याची पाने व इतर फळांचा रस वापर करण्यात आला आहे. यामुळे मंदिरातील श्रीं चा गाभारा व चौखांबी आमराई ने नटली आहे. सद्या कोरोनामुळे श्री विठ्ठल रुक्मिणीचे मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद ठेवण्यात आले आहे. मात्र, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी विठ्ठल जोशी व व्यवस्थापक बालाजी पूदलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या आमराईची आरास व श्री विठ्ठल रुक्मिणी दर्शन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या संकेत स्थळ व इतर सोशल मीडियाच्या माध्यमातून घेता येत आहे.

पंतप्रधानांनी केले देशवासियांचे अभिष्टचिंतन

नवी दिल्ली, दि.१४ (हिंदुस्थान समाचार) : अक्षय तृतीया, परशुराम जयंती आणि रमजान ईदच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी त्यांनी नागरिकांना उत्तम आरोग्य लाभावे आणि सामूहिक प्रयत्नातून कोरोनावर विजय मिळावा असे म्हंटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्वीटरवर ३ वेगवेगळे संदेश जारी करून अक्षय तृतीया , परशुराम जयंती आणि रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्यात. त्यापैकी पहिल्या ट्वीटमध्ये मोदी म्हणाले की, शुभारंभासाठी उत्तम मुहूर्त असलेल्या अक्षय तृतीयेला आमच्या कोरोनामुक्तीच्या संकल्पाला बळ मिळो. आपल्या दुसऱ्या ट्वीटमध्ये मोदींनी परशुराम जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच मुस्लीमांच्या ईद-उल-फितर सणाच्या पार्श्वभूमीवर शुभेच्छा देताना मोदी म्हणाले की, सर्वांच्या उत्तर आरोग्यासाठी प्रार्थना करतो आणि सामूहिक प्रयत्नातून आपण जागतिक साथरोगाचा पराभव करू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच मानव कल्याणाच्या दिशेने काम व्हावे असा मनोदय त्यांनी व्यकत केला.

चंद्रपूर : मनपाच्या परिचारिकांना मिळणार सुट्यांचे वेतन – महापौर

चंद्रपूर, दि. १३ : चंद्रपूर शहरात कोरोनाचे संकट आल्यापासून रुग्णसेवा देण्यासाठी महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाच्या परिचारिका रुग्णांना अहोरात्र सेवा देत आहेत. मागील वर्षभरापासून त्या कोणतीही सुटी न घेता सेवाकार्य करीत आहेत. त्यांच्या या कार्यासाठी आठवडाभरात सुट्यांचे वेतन दिले जाईल, असे आश्वासन महापौर राखी संजय कंचर्लावार यांनी दिले. आद्य परिचारिका फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांचा जन्मदिवस १२ मे हा संपूर्ण जगात परिचारिका दिन म्हणून साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर चंद्रपूर शहर महानगर पालिकेच्या राणी हिराई सभागृहात झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात कौतुक सोहळा घेण्यात आला.

या प्रसंगी महापौर राखी संजय कंचर्लावार म्हणाल्या, कोविड- च्या पहिल्या लाटेपासून ते आतापर्यंत परिचारिका रुग्णसेवेत मेहनत घेत आहेत. आपले घर, कुटुंब यांची जबाबदारी सांभाळत, त्यांनी रुग्णसेवेलाच प्रथम प्राधान्य दिले आहे. आजही त्या डॉक्टर्स आणि तज्ज्ञांच्या खांद्याला-खांदा लावून काम करीत आहेत. या योगदानाचे कौतुक करावे तितके कमी आहे. अनेकांनी लॉकडाऊन एन्जॉय केले. पण, परिचारिकांना सण-उत्सवातील सुट्यांचे दिवसदेखील कुटुंबियांसोबत घालविता आले नाहीत. त्यांच्या या कार्यासाठी आठवडाभरात सुट्यांचे वेतन दिले जाईल, असे आश्वासन महापौर राखी संजय कंचर्लावार यांनी दिले. तुमच्या त्याग, समर्पणाला मानाचा मुजरा. तुमचे हे योगदान कदापिही विसरणार नाही, अशा शब्दांत स्थायी समिती सभापती रवी आसवानी यांनी रुग्णसेवेत अथक परिश्रम घेणाऱ्या परिचारिकाविषयी कौतुकोद्गार काढले. उपायुक्त विशाल वाघ यांनी कोविडच्या या संकटात घर, कुटुंबाचे बंधन बाजूला ठेवून, जीवाची पर्वा न करता रुग्णसेवेसाठी झटणाऱ्या परिचारिकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी परिचारिकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

अक्षय तृतीया निमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राज्यातील जनतेला शुभेच्छा

मुंबई, दि.१४ (हिंदुस्थान समाचार) : वसंत ऋतूतील वैशाख महिन्याच्या सुरुवातीला येणाऱ्या अक्षय तृतीया सणाचे आपल्या कृषी संस्कृतीत अनन्यसाधारण महत्व आहे. बळीराजाच्या दृष्टीने वर्षभरातील पीक-पाण्याच्या नियोजनासाठी हा सण अत्यंत महत्वाचा असतो. निसर्गाशी नातं सांगणारा साडे तीन मुहुर्तांपैकी एक असणाऱ्या अक्षय तृतीयाच्या मुहुर्तावर अनेक चांगल्या कामांची सुरुवात करण्याची आपली परंपरा आहे. ही परंपरा कायम राखत यंदाचा अक्षय तृतीयाचा सण आपल्या सर्वांच्या जीवनात सुख, समाधान, समृध्दी, आनंद, उत्तम आरोग्य घेऊन येवो, या शुभेच्छा...

PUBLIC NOTICE

Take notice that Mrs. Aziz Fatima Sayyed is the owner of Flat No. C/102, on First Floor, in Shish Mahal Co-op Hsg. Soc. Ltd.", R.N.P. Park , Bhayander (E), Dist Thane- 401105, that she has been last and misplaced her original Share Certificate No. 49, Dist. No. 241 To 245, issued by the said society . All the person/s and her legal heirs informed that if anybody found the said Share certificate and or have any type of right , title and interest and claim in the said Flat , kindly send at my address and or informed me with original documentary evidence within 15 days from the date hereof, falling which such claims, if any shall not be considered and shall be deemed to have been waived and abandoned.

Date: 15.05.2021 **SATISH S. CHAUBEY (Advocate High Court)**
B/123, Ostwal Ornate Bldg. No. 2, Jesal Park, Bhayander (E) Dist.: Thane – 401105,

कोरोना काळात रुग्णसेवा देणाऱ्या मानधनावरील वैद्यकीय कर्मचाऱ्यांना महापालिका देणार कोविड भत्ता

पुणे, दि. १४ (हिंदुस्थान समाचार) : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, महापालिका इतर रुग्णालये, दवाखाने या ठिकाणी कोरोनाच्या काळात मानधनावर कार्यरत असलेल्या तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, दंतशल्य चिकित्सक यांना १५ हजार रुपये, स्टाफनर्स व सर्व पॅरामेडीकल स्टाफ यांना १० हजार, प्रयोगशाळा सहाय्यक / वर्ग ४ मधील कर्मचारी यांना ५ हजार याप्रमाणे मानधनाव्यतीरिक्त स्वतंत्र कोविड भत्ता देण्यात येणार आहे.१ एप्रिलपासून ३० जून अखेर दरमहा हा भत्ता देण्यात येणार आहे. यासंदर्भात आज झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.याबाबतची माहिती महापौर उषा ढोरे यांनी दिली. महापालिकेच्या वैद्यकिय अत्यावश्यक सेवेकरीता एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात तज्ञ वैद्यकिय अधिकारी, वैद्यकिय अधिकारी व पॅरामेडिकल कर्मचारी तसेच वर्ग ४ मधील कर्मचा-यांची कोवीड १९ चे कामकाजाकरीता नियुक्ती करण्यात येते. या मानधनावरील अधिकारी / कर्मचा-यांना सद्यस्थितीत शासन निर्णय व किमान वेतन दरानुसार मानधन दिले जात आहे. महापालिका परिसरात १० रुग्णालये व २७ दवाखाने कार्यरत आहेत.

कोरोना अपडेट : देशात २४ तासात ३ लाख ४३ हजार १४४ नवीन रुग्ण

नवी दिल्ली, दि.१४ : देशात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने हाहाकार माजला आहे. दररोज लाखो रुग्णांची भर पडत आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, देशात मागील २४ तासात ३ लाख ४३ हजार १४४ नवीन रुग्णांची भर पडली आहे. तर,३ लाख ४४ हजार ७७६ रुग्णांनी कोरोनावर मात केली असून ४००० रुग्णांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. देशात कोरोनाची लागण होण्याचे प्रमाण दोन कोटींच्या पुढे गेले असून कोरोनामुळे मृत्यूंचा आकडा २.६२ लाखांच्या वर पोहोचला आहे.

CHANGE OF NAME

I HAVE CHANGED MY NAME FROM ANSARI SHAKEEL AHMED MOHD AFAQUE TO MOHD SHAKEEL ANSARI MOHD AFAQUE VIDE GOVT OF MAHARASHTRA GAZETTE (M-2110969)

I HAVE CHANGED MY NAME FROM CHANDRASHEKHAR BHASKAR MHASKAR TO CHANDRASHEKAR BHASKAR MHASKAR VIDE GOVT OF MAHARASHTRA GAZETTE (M-2111461)

I HAVE CHANGED MY NAME FROM RAJESH KISHANDAS KHATTAR TO RRAJESH KKISHANDAS KHATTER VIDE GOVT OF MAHARASHTRA GAZETTE (M-2111271)

I HAVE CHANGED MY NAME FROM NUTAN KUMARI TO NUTAN ANUJ JHA VIDE GOVT OF MAHARASHTRA GAZETTE (M-2112028)

I HAVE CHANGED MY NAME FROM RITESH BANSILAL KAJAL PARASWANI TO RITESH PARASWANI VIDE GOVT OF MAHARASHTRA GAZETTE (M-2110496)

I HAVE CHANGED MY NAME FROM RITESH BANSI PARSWANI TO RITESH PARASWANI VIDE GOVT OF MAHARASHTRA GAZETTE (M-2110755)

I HAVE CHANGED MY NAME FROM SUNI JOSEPH NIRAPPEL TO SUNI KARIMALIPUZHA DILEEP VIDE GOVT OF MAHARASHTRA GAZETTE (M-219670)

I HAVE CHANGED MY NAME FROM SHUBHANGI BHASKAR SARWADE TO ASMITA RANJIT PANIKKAR VIDE GOVT OF MAHARASHTRA GAZETTE (M-2112111)

I HAVE CHANGED MY NAME FROM SHINDUTAI BHASKAR SARWADE TO AMRUTA BHASKAR SARWADE VIDE GOVT OF MAHARASHTRA GAZETTE (M-2112074)

I HAVE CHANGED MY NAME FROM LAVINA LAWRENCE FERNANDES TO LAVINA JAMES DSOUZA VIDE GOVT OF MAHARASHTRA GAZETTE (M-211027)

I HAVE CHANGED MY NAME FROM AARON VIKRANT FERNANDES TO AARONA VIKRANT FERNANDES VIDE GOVT OF MAHARASHTRA GAZETTE (M-2111055)

I HAVE CHANGED MY NAME FROM DEVANSHI NITIN KHANDHAR TO DEVANSHI RAJKUMAR PILLAI VIDE GOVT OF MAHARASHTRA GAZETTE (M-2111158)

I HAVE CHANGED MY NAME FROM HAMZATH RIYAZ SHAIKH TO HAMZATH RAJAUL SHAIKH AS PER ALL DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM SIDDHANTKUMAR HARENDRAKUMAR RAJBHAR TO SIDDHANT HARENDRA RAJBHAR AS PER ALL DOCUMENTS

I BAROT HIMANI HAVE CHANGED MY NAME TO HIMANI ANIKET BRAHMBHATT AS PER MAHARASHTRA GOVERNMENT GAZZETE NO. (M-197650) DATE 25/04/2019

PUBLIC NOTICE

Notice is hereby given that my client, **Mrs. Jane Leo Miranda,** hereby declare that my Client's Original Share Certificate lost at Nallasopara, of Flat No. B/202, 2nd Floor, in the Building known as " NEELKAMAL NIWAS CHS LTD.", Opp. Shiv Sena office Central Park, Village- More, Nallasopara East, Tal-Vasai, Dist. Palghar Share Certificate No. 034, Shares each of Rs. 50/- ,Distinctive Nos. From 166 to 170. So we hereby invite claim or objection that any person having any claim or objection against or into or upon in respect of said flat howsoever are hereby required to make the same known in writing to our advocate office within 7 days from the date of publication.

Date: 15/05/2021 **D. S. TIWARI (Advocate High Court)**
Add- Office No. 19, Akanksha Tower, Near Railway Station, Nallasopara (E)

सूचना

'दै. मुंबई लक्षदीप' वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातीम धील समाविष्ट सर्व बाबी तपासून पाहणे शक्य नाही. जाहिरातदाराकडून त्याच्या दाव्याची पूर्तता झाली नाही तर त्या परिणामाबद्दल 'दै. मुंबई लक्षदीप' वृत्त समूहाचे संचालक, संपादक, प्रकाशक हे जबाबदार राहणार नाहीत. कृपया वाचकांनी जाहिरातीत असलेल्या स्वरूपामध्ये कोणताही करार करण्यापूर्वी आवश्यक ती चौकशी करावी.

MUKTA ARTS LIMITED
CIN:L92110MH1982PLC028180
Regd. Office : Mukta House,Behind Whistling Woods Institute,Filmcity Complex, Goregaon (East),Mumbai- 400 065.
Tel. No. (022) 33649400;
Fax No. (022) 33649401.
Website:www.muktaarts.com

NOTICE

Pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements)Regulations, 2015, notice is hereby given that a meeting of the Board of Directors of Mukta Arts Limited will be held on Tuesday, 25th May, 2021 at 12 pm through Video Conferencing (VC) or Other Audio Visual Means (OAVM) to consider, approve and take on record the Audited Standalone and Consolidated Financial Results of the Company for the year ended 31st March, 2021.

The said information is also available on the Company's website at www.muktaarts.com as well as on the website of the stock exchanges at www.bseindia.com & www.nseindia.com.

By the Order of the Board of Directors
For **Mukta Arts Limited**
Monika Shah
Company Secretary

Place : Mumbai
Date : 14.05.2021